VOL- IX ISSUE- II FEBRUARY 2022 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 7.331 ISSN 2349-638x

# जॉर्ज सन्तायना : एक शिक्षण तपस्वी


डॉ. प्रकाश कांबळे.
सहयोगी प्राध्यापक
श्रीमती सुशिलादेवी साळुंखे कॉलेज ऑफ एज्युकेशन, उस्मानाबाद.
ई मेल : pkprakashkambale@gmail.com

पार्श्वभूमी :

*प्रत्येकाला माहीत आहे की दोन अमेरिका आहेत. त्यातील एक युरोपियन अमेरिका आहे. पूर्वेकडील संस्थाने ही विशेषतः युरोपियन अमेरिकेत येतात. त्या संस्थानातील जुनी घराणी अदयाप परदेशी खानदानी घरण्यांकडे आदराने बघतात आणि जे नुकतेच युरोपातून वगैरे आले ते स्वतःच्या स्वदेशविरहाच्या दुःखद भावनेने आपल्या मूळ देशाकडे पाहतात. या युरोपियन अमेरिकेत शांत, समतोल, सौम्य अशा ॲंग्लोसॅक्सन वन्नत्तीचा आणि अस्थिर, अशांत, धडपडया, नवनवोत्सुक नव्या लोकांच्या वन्नत्तीचा सदैव झगडा चाललेला असतो. जोनॅथन एडवर्डस हा पहिला अमेरिकन तत्वज्ञानी या नवइंग्लंडातच झाला. अमेरिकेचा अगदी अलीकडचा विचारवंत जॉर्ज सन्तायना यालाही नवइंग्लंडनेच आकर्षिले व त्याचे स्वरूप बदलले. जॉर्ज सन्तायना मोठा विचित्र होता. त्याचा जन्म स्पेनमधला परंतु त्याला कळत नव्हते इतक्या लहान वयात त्याची अमेरिकेत रवानगी झाली होती व आपल्या वन्नध्दावस्थेत तो युरोपात जाणार आहे. दुसरी अमेरिका आहे हिच्यात राहणारे लोक यान्की, होजिअर्स कोणीही असोत त्यांची मुळे युरोपात नसून याच भूमीत मूळात रूजलेली आहेत. या अमेरिकेने लिंकन, थोरो, व्हिटमन, मार्कट्ध्वेन यांना जन्म दिला. जॉन डयूईची घडण केली ती हीच अमेरिका आहे.*

परिचय :

जॉर्ज सन्तायनाचा जन्म १६ डिसेंबर १८६३ साली स्पेनमधील माद्रिद येथे झाला. १८७२ मध्ये त्याला अमेरिकेत आणले गेले. १९१२ पर्यंत तो तिथे राहिला. हॉर्वर्ड येथे पदव्या घेतल्या आणि तेथेच वयाच्या सत्ताविसाव्या वर्षापासून पन्नास वर्षापर्यंत तो शिकवित होता. आपल्या मोठया तत्त्वज्ञान्यांतील तो जरी सर्वात लहान असला तरी अधिक जुन्या व परकीय संप्रदायाचा प्रतिनिधी आहे. त्याच्या विचाराची सूक्ष्मता, त्याच्या भाषाशैलीतील सुगंध, यांचा एखादया खोलीतून नुकतीच फुले नेल्यावर तेथे जसा वास दरवळत राहतो तसा तो वाटतो. सन्तायनाच्या एका विदयार्थ्याने पुढीलप्रमाणे त्याचे हुबेहुब वर्णन केले आहे – वर्गातील ज्यांना आठवत असेल त्यांना ती गंभीर गोड मूर्ती आठवत असेल. थोडा निवन्नत्तीपर असा त्यांचा स्वभाव होता. नवयुगातील चित्रकाराने त्यांचा चेहरा चितारला असता तर त्याने त्यांचे डोळे व मंद व पवित्र स्मित त्याच्या चेहऱ्यावर रेखाटले असते. त्यांचा आवाज गंभीर व सुंदर होता. त्यांचे उच्चार मधुर व तालबध्द होते व त्यात एक प्रकारचा समतोल होता. त्यांच्या तासात कवितेचे जटिल पूर्णत्त्व व भविष्य कथनासारखा आशय असायचा. ते आपल्या श्रोत्यांची अंतःकरणे ढवळून काढायचे व जशी देववाणी असते तसे ते बोलून ऐकणाऱ्यांच्या मनांना त्रस्त करायचे. त्यांच्या शब्दांत गूढता व आदरभाव असायचा आणि त्यात दूरता व कल्पना रम्यता यांचे सुमधूर मिलन झालेले असावयाचे. ते इतरांची अंतःकरणे हेलावून सोडीत पण स्वतः मात्र अविचलित राहायचे. त्यांना अमेरिका देश आवडेना झाला. त्यांचे मन अध्ययनाने मन्नदू झालेले होते, कविच्या मनाप्रमाणे हळू झालेले होते. अमेरिकन शहरातील गडबडीचे, धावपळीचे जीवन त्यांना त्रासदायक वाटे. ते बोस्टनला गेले आणि तेथून पुढे केंब्रिज व हॉर्वर्ड येथे गेले. त्यांची ग्रंथ संपदा खालीलप्रमाणे आहे –




तत्त्वज्ञानातील त्यांचा पहिला निबंध The Sense of Beauty हा १८९६ मध्ये प्रसिध्द झाला. सौंदर्यशास्त्रात अमेरिकेने घातलेली उत्तम भर असे त्याचे वर्णन सुप्रसिध्द वास्तववादी विचारवंत Munsterberg यांनी केले आहे. त्या काळात तो जीवनाचे सर्वश्रेष्ठ कार्य सर्वात महनीय ग्रंथ तयार करीत होता. The Life of Reason या ग्रंथाचे पाच खंड प्रकाशित झाले. या पुस्तकांचा प्रसार फार जरी झाला नाही तरी त्याला कीर्ती मिळाली व ती गुणानुरूप होती.

संशयवाद आणि प्राणीसुलभ श्रध्दा :

सन्तायना सर्व गोष्टींचा संशय घ्यावयास तयार आहे. ज्या इंद्रियांच्या व्दारा जग वाहत आलेले आहे त्या इंद्रियांच्या गुणांनी रंगून त्याच्यातून ठिबकत जग आपणाकडे येते आणि भूतकाळही इच्छेने रंगवलेल्या स्मन्रतींच्या व्दारा आपणांसमोर उभा राहतो. इच्छा स्वत:ला हवा असेल तो रंग स्मन्रतीला देते. एकच गोष्ट सन्तायनाला निश्चित दिसते की, या क्षणीचा अनुभव हा रंग, हा गंध, ही रूची, हा आकार, हा गुण हे सर्व म्हणजे खरे जग असते व त्यांचे संवेदन होणे हा साराचा शोध असतो. आपल्या कल्पनांच्या व्दारे आपण हे दन्रश्य जग जाणतो हे खरे, परंतु हे जग हजारो वर्षे वागत आले आहे. जणू आपली संमीलित संवेदने खरी आहेत असे समजूनच जे जग हजारो वर्षे वागत आले आहे आणि म्हणून भविष्यकाळाची चिंता न करता त्याची ही फलवादी संमती आपण स्वीकारायला हरकत नाही. प्राणीसुलभ श्रध्दा ही मिथ्याकथेवरील श्रध्दा असू शकेल, पण ती मिथ्याकथा चांगली मिथ आहे कारण जीवन हे कोणत्याही संविधानापेक्षा चांगले आहे. अनुभवाच्या सत्यतेची शंका घेणे, साशंकतेच्या प्रयत्नात कडक राहण्याची जी ही शिस्त आहे ती जर्मनांनी पराकाष्ठेला नेली. एखादा वेडा हातांना मुळात घाण लागलेली नसतांना घाण धुण्यासाठी सारखे सारखे हात धूत राहत असावा त्याप्रमाणे जर्मनांना संशय घेण्याचा रोगच जडला होता.

विज्ञानातील प्रज्ञा :

The Life of Reason प्रज्ञेचे जीवन, हे जाणिवेत आपल्या परिणामांकडून ज्यांचे समर्थन केले जाते अशा सर्व विचारांचे व कन्रतींचे नाव आहे. प्रज्ञा, विवेकबुध्दी सहजप्रवन्रत्तींची शत्रू नाही, त्या सर्वांचा यशस्वी मेळ म्हणजे विवेकबुध्दी किंवा प्रज्ञा होय. आपला स्वत:चा मार्ग व ध्येय यांच्यावर प्रकाश टाकणारा व आपणांमध्ये बोधपूर्वक कार्य करणारा हा निसर्ग म्हणजे ही विवेकबुध्दी होय. आवेग आणि कल्पकता या दोन घटकांनी विवेकबुध्दी बनत असते. या दोहोंचा जर काडीमोड झाला तर मनुष्य वेडा होईल किंवा पशूतरी होईल. या दोहोंच्या ऐक्याने हा विवेकशील मनुष्य जन्मतो. ज्या कल्पना केवळ स्वैरकल्पना करण्यात विरून जात नाहीत व त्या कन्रती निरर्थक ठरत नाहीत अशांनी मानव तयार होत असतो. प्रज्ञा किंवा विवेकबुध्दी ही ईश्वराची मानवाने केलेली नक्कल आहे. सर्व वैज्ञानिक ज्ञान विश्वासाई असते म्हणून बुध्दीनिष्ठ जीवन विज्ञानावर उभारले पाहिजे हे खरे, ही गोष्ट प्रांजळपणे कबूल करायला हवी. विवेकबुध्दीमधील धोका व विज्ञानातील क्षमतेला सन्तायना जाणून आहे. वैज्ञानिक पध्दती म्हणजे अनुभवात आपण ज्या नियमितता पाहतो त्यांचे संक्षिप्त वर्णन असते. या जगाचे नियमन करणारे नियम हे अपरिवर्तनीय व निश्चित असले पाहिजेत असा नियमांचा विचार करण्याऐवजी आपल्या अनुभवातील नियमिततांचे संक्षिप्त वर्णन म्हणजे वैज्ञानिक पध्दती असे जे आजचे या पध्दतीचे पन्रथक्करण केलेले आहे ते सन्तायना स्वीकारतो. परंतु विज्ञानात जरी काही बदल केले तरी शेवटी विज्ञानावरच आपली भिस्त असावयास पाहिजे व त्यावरच आपण विसंबून राहावयास पाहिजे. बुध्दीवर श्रध्दा ही एक खरीखुरी श्रध्दा आहे. या श्रध्देला तिच्या फलांचा मजबूत आधार व पाठिंबा अशा रीतीने सन्तायना जीवनाकडे पाहतो. ज्ञान विज्ञानहीन जीवन, विवेकज्ञान विरहीत जगणे मनुष्याला शोभत नाही असे सन्तायना मानतो.

धर्मातील प्रज्ञा :

एका प्राचीन धर्मकार्यात ऑक्सफर्ड येथे सन्तायना स्वत:चे खालीलप्रमाणे वर्णन करतो – मी हूपार झालेलो आहे, जेथे Guadaranna आपला जांभळा

पापुद्रा उंचावतो आणि ज्यावरून वारा जोरात वाहून गेलेला आहे अशा ओसाड प्रदेशातूनच मी हूपार झालेलो नाही, तर सर्व आशांचे जे ध्येय असते व जे सर्वोत्तमाचे जे दर्शन असते अशा दिव्य आत्म्याच्या प्रदेशातूनही मी हूपार झालेलो आहे. सन्तायनाचे मत आहे की भीतीने देव घडविले गेले. जेव्हा मनुष्य अत्यंत हीनदीन स्थितीत होता, तेव्हा अति भौतिक वस्तूंवर त्याने श्रध्दा ठेवली. ती त्याने लावलेली एक प्रकारची पैज आहे. ती त्याला लागणाऽया सर्वसामान्य प्राणशक्तीचे उगमस्थान आहे. सन्तायनाला वाटते खिश्चन धर्म शब्दश: न घेऊ तर त्याच्यासारखे सुंदर क्वचितच काही असेल. परंतु जर्मनांनी तो शब्दश: घेण्याचा हट्ट धरला. म्हणून खिश्चन धर्माचे जुने (सनातनी)रूप जर्मनीत त्यानंतर नष्ट होणे अटळ ठरले. त्याचे शब्दश: अर्थ लावल्याने नष्पापांची अधोगती होते, सर्वसामर्थ्य संपन्न ईश्वराने कल्याणकारी भावनेने या जगाची निर्मिती केलेली असूनही त्यात दु:खाचे व दुरिताचे वास्तव्य असते, अशी जुनी धार्मिक तत्त्वे आहेत यापेक्षा अधिक अर्थहीन काही असू शकणार नाही. व्यक्ती व्यक्ती बायबलचे पन्नथक पन्नथक स्पष्टीकरण व अर्थविवरण करू लागल्यावर अनेक पंथ व संप्रदाय उत्पन्न झाले व सौम्य प्रकारचा सर्वेश्वरवादही आला. हा संपन्न व प्रतिष्ठित लोकांचा सर्वेश्वरवाद काव्यात्मक रीतीने व्यक्त केलेल्या निसर्गवादापेक्षा अधिक काही नव्हता. सन्तायना म्हणतो, जो ध्येयात जगतो आणि समाजात ते ध्येय प्रकट करून मूर्त करून जातो किंवा कलेच्या रूपाने व्यक्त करून जातो, तो दोन प्रकारची अमरता अनुभवतो. जो जिवंत असतानाच अमरत्वाने त्याला स्वत:मध्ये सामावून घेतले असते आणि तो मेलयवर त्याचा परिणाम इतरांवर होऊन ते ही अमरत्वात सामावून घेतले जातात. त्याच्यामधील जी उत्कटता असते तिच्याशी ते लोक एकरूप होतात. ज्या गोष्टीचा नाश होऊ नये, नाशापासून वाचावी असे त्याला वाटत असते, त्या हृदयातील उत्कटाचे असे अमर अवतार, अमरस्थाने तो अशा रीतीने निर्माण करतो.

समाजातील प्रज्ञा :

तत्त्वज्ञानासमोर एक मोठा प्रश्न नेहमी असतो की, मनुष्यांनी सदगुणी राहावे म्हणून त्यांची मने कशी वळवावी, कोणते उपाय योजावे ? दैवी व परलोकीच्या आशा व भीती न दाखविता, त्यांनी प्रवन्नत्त न करता करता दुसऽया कोणत्या मार्गाने लोकांना सदाचार आचरण्यास प्रवन्नत्त करावे ? दोन वेळा या प्रश्नांची उपपत्ती मांडली गेली. सॉक्रेटिस व स्पिनोझा या दोघांनी जगाला स्वाभाविक व बौध्दिक, विवेकाधारित नीती दिली. सारे लोक तत्त्वज्ञानी झाले, विचाराने वागू लागले तर सारे गाडे ठीक चालेल. परंतु या जगात खरी विवेकाधारित नीती किंवा सामाजिक स्वास्थ्याची नियमसंहिता कधीच अस्तित्वात नव्हती व तशी क्वचितच कोठे सापडेल. बहुजन समाजात केवळ वैचारिक नीती कधी आली नाही. तत्त्वज्ञानाच्या स्वत:च्या हृदयात एक आश्रयस्थान असते ज्यातून तो परलोकींचा कल्पित आनंद काव्यमय रूपाने प्रकट होत असतो. परलोकी मिळणारे सुख म्हणजे याच्या या हृदयातून प्रकट झालेली काव्यमय कल्पना. तत्त्वज्ञानाला सत्यात आनंद असतो आणि एखादा देखावा पाहायला वा सोडायला त्याची तितकीच तयारी असते. मानवी सातत्य चालविण्याचा कुटुंब हा मार्ग आहे आणि म्हणून मानवात अदयाप कौटुंबिक संस्थेला फार महत्त्व आहे म्हणजे पाया आहे. इतर सर्व संस्था अपयशी झाल्या तरी कुटुंबसंस्था मानवी जीवन टिकविल, पुढे नेईल. परंतु कुटुंबामुळे काही एका मर्यादेपर्यंतच संस्कन्नती पुढे जाते. ती एक साधे शिखर गाठते. जगाला जी काही संस्कन्नती परिचित आहे ती प्रतिष्ठित वरिष्ठ वर्गाच्या श्रमांचे फळ आहे असे सन्तायना म्हणतो. प्रतिष्ठित लोकांच्या केंद्रातून नवीन नवीन चालीरिती निघतात व झिरपत त्या खाली जातात, यालाच संस्कन्नती म्हणतात. सन्तायना म्हणतो की, प्रतिष्ठित वर्गीय लोकांपाशी जसे काही चांगले गुण व फायदे आहेत तसे त्यांचे काही दोषही आहेत. ज्यांना उच्च व आनुवंशिकतेचा वारसा मिळत नाही, पण जे बुध्दीमान व कर्तन्नत्ववान असतात त्यांना उच्चवर्गीय लोक विकासाचे दरवाजे बंद करतात आणि त्यांचा विकास अडवितात. मूठभर लोकांच्या स्वातंत्र्यासाठी लाखो लोकांना दास्याची किंमत मोजावी लागते. राजकारणाचे पहिले तत्त्व हे असावे की, समाजातील घटक व्यक्तींचे जीवन व शक्ती यांची वन्नध्दी ज्या प्रमाणात समाज करील त्यावरून त्या समाजाचा दर्जा ठरवावयास पाहिजे. विशिष्ट प्रकारच्या जीवनाचा परमोत्कर्ष ज्या राष्ट्रात घडून येत नाही त्याची समुद्राच्या वाळूप्रमाणे लक्षात राहण्याची लायकी नसते.

समारोप :

सन्तायनाच्या तत्त्वज्ञानाविषयी आपण असे म्हणू शकू की, त्यांचे तत्त्वज्ञान म्हणजे निर्भय व सत्य असे आत्माविष्करण आहे. एका परिपक्व बुध्दीच्या सूक्ष्म व गंभीर पण खरा खिन्न अशा आत्म्याने आत्मचरित्र जणू रूबाबदार, अभिजात व सुंदर गदयात शांतपणे लिहून काढले आहे. त्याचा खालचा सूर आणि नष्ट झालेल्या जगाविषयीची मधुर खिन्नता जरी आपणांस आवडली नाही तरी त्यात आपणांस सध्याच्या या मरणोन्मुख व जन्माला येणाऽया नवीन युगाचे पूर्ण केलेले आविष्करण पाहावयास मिळते.

**संदर्भ**

1. साने गुरूजी, पाश्चिमात्य तत्त्वज्ञानाची कहाणी, २०११, कोल्हापूर, रिया पब्लिकेशन्स.
2. डॉ.सहदेव चौगुले, पाथेय भाग – १ ;२०१२, कोल्हापूर, रिया पब्लिकेशन्स.
3. Santayana ki paribhasha shabdkosh.com